पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. २५
वर्ष ८ वे, अंक २० वा
किंमत १ रुपया
६ फेब्रुवारी १९९२

शेतकरी संघटक

# खऱ्या विकास कार्याच्या सुरुवातीसाठी शेतकरी महिला आघाडी

**माझ्या शेतकरी भावांनो**
**आणि मायबहिणींनो,**

पुऱ्या १३ वर्षांनी महाराष्ट्रात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. मध्यंतरीच्या काळांत लोकसभेच्या चार निवडणुका झाल्या, राज्य विधानसभेच्या निवडणुका तीनदा झाल्या. पंचायत राज्याच्या निवडणुका घ्यायला मात्र शासनाला सवड होत नव्हती.

जुन्या जिल्हा परिषदांचे आणि पंचायत समित्यांचे सदस्य त्यांच्या जागी कंटाळून गेले. एक कॉँग्रेसी सदस्य तर म्हणाला "आता खाऊन खाऊन कंटाळा आला" तरी शासनाला या निवडणुका घ्यायची हिम्मत होत नव्हती.

शेतकरी महिला आघाडीने नवीन निवडणुका घडवून आणण्याची मागणी नेटाने चालवली होती. राजीव गांधी पंतप्रधान असतांना "१९८९ साली या निवडणुका होतील" अशी त्यांनी ग्वाही दिली होती. त्यांचा शब्द पाळण्याचीसुद्धा महाराष्ट्र शासनाची इच्छा नव्हती.

शेतकरी महिला आघाडीने या दिरंगाईचा निषेध केला. शेतकरी महिलांनी हा प्रश्न वेशीवर टांगण्यासाठी एक दिवस मोठा सत्याग्रहाचा कार्यक्रम केला. प्रत्येक जिल्ह्यात ह्या परिषदांच्या कार्यालयांना घेराव घातला. अध्यक्षांच्या कार्यालयांत जाऊन त्यांची मानाची खुर्ची कब्जांत घेण्याचा कार्यक्रम केला. तरीही शासन ढिम्म हलायला तयार नव्हते.

तशा या निवडणुका मार्च १९८७ मध्ये व्हायचे ठरले होते. सगळ्या तयाऱ्या झाल्या होत्या. पण नोव्हेंबर १९८६ मध्ये चांदवड येथे शेतकरी महिला अधिवेशन झाले. लाखांच्या संख्येने महिला उपस्थित राहिल्या. स्त्री शक्तीच्या त्या भव्य आणि समर्थ दर्शनाने सगळेच दिपून गेले.

चांदवड अधिवेशनाचा एक महत्त्वाचा ठराव जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या

***२५ फेब्रुवारी ९२ रोजी होणाऱ्या जि. प. व पंचायत समित्या यांच्या निवडणुका शेतकरी महिला आघाडी लढवीत आहे. त्यामागची भूमिका शेतकरी संघटनेचे नेते व महिला शेतकऱ्यांचे भाऊ श्री. शरद जोशी समजावून देत आहेत —***

यांच्या निवडणुकांसंबंधी होता. होऊ घातलेल्या निवडणुकांत सर्वच्या सर्व जागा महिलांनी लढवण्याचा निर्धार या ठरावांत जाहीर करण्यांत आला होता. या घोषणेने तर गावगन्ना पुढाऱ्यांचे धाबेच दणाणले. लगेच निवडणुका पुढे ढकलण्याची घोषणा झाली. एकदा, दोनदा, तीनदा, पांच..... वेळा निवडणुकांची अशी कुतरओढ झाली.

स्त्री शक्तीच्या सामर्थ्याला तोंड कसे द्यायचे हे शासनाला समजेना. मग शासनाने एक युक्ती काढली. "जीवावर बेतलेले शेपटावर निभवावे" अशा हिशोबाने पंचायत राज्यातील ३०% जागा महिलांकरिता राखीव ठेवण्यांत आल्या. गणित असे की निदान उरलेल्या ७०% जागा तरी सुरक्षित रहाव्यात.

१९८९ च्या निवडणुकांत कॉँग्रेस शासन बुडता बुडता वाचले. राज्य शासन स्थिर नाही. जिल्हा परिषदांच्या उचापती कोठे करत बसतां? अशा धास्तीने निवडणुका आणखी पुढे ढकलण्यांत आल्या. कोर्टाच्या आदेशाचे केवळ निमित्त शासनाने वापरले. कोर्टाचा आदेश इच्छा असली तर कसा पटकन बाजूला करता येतो हे सुधाकरराव नाईकांनी आता दाखवून दिलेच आहे!

तेवढ्यांत, महाराष्ट्रांत आयाराम गयारामांचे पीक आले. केन्द्रांतही कॉँग्रेसचे राज्य आले. विरोधी पक्ष खिळखिळे होऊ घातले. आता सामन्याला कोणीच नाही असे वाटू लागल्यावर पळपुट्या शासनाला निवडणुका जाहीर करायची तेरा वर्षांनी हिम्मत झाली आहे.

महिलांकरिता जागा राखीव ठेवणे ही कल्पना मुळातच हास्यास्पद आहे. महिला म्हणजेच काही मागास जाती जमातीच्या नव्हेत की त्यांच्या करता जागा राखीव ठेवाव्या. अशा तऱ्हेने राखीव जागा ठेवणे म्हणजे समग्र महिला समाजाचा अपमान आहे. पण ७०% जागा पुढाऱ्यांना सुरक्षित करण्यासाठी शासनाने ही चालबाजी केली आहे.

बरे, ३०% जागा राखीव ठेवायचे तर ठरवले. पण कोणते मतदारसंघ राखीव ठेवायचे? अनुसूचित जाती जमातींकरतां मतदार

संघ राखीव ठेवण्यांत येतात. ज्या मतदार संघात अशा जातीजमातींची लोकसंख्या मोठी असेल अशांपैकी काही मतदार संघ निवडले जातात.

ही पद्धत महिलांच्या बाबतीत कशी लागू करणार? महिलांचे प्रमाण सगळ्या मतदारसंघांत सारखेच. निम्म्याला निम्मे. मग राखीव मतदार संघ निवडायचे कसे? शासनाने चिठ्ठ्या टाकून राखीव मतदार संघ ठरवले. पुढच्या निवडणुकांच्या वेळी यावेळच्या सर्वसाधारण मतदार संघाच्या नावांच्या चिठ्ठ्या पुन्हा टाकणार आहेत. म्हणजे यावेळच्या सर्व राखीव जागा पुढच्या वेळी बिगरराखीव होणार. आणि यंदाच्या साधारण जागांपैकी निम्म्या जागा पुढच्या वेळी राखीव होणार असा पोरखेळ शासनाने मांडला आहे. पंचायत राज्य व्यवस्थेची ही क्रूर चेष्टा आहे.

महिलांना सामाजिक जीवनांत स्थान मिळवून द्यायचे तर निवडणुकांतील त्यांच्या सहभागाचा परिणाम एकूण एक मतदारसंघांत जाणवला पाहिजे. सध्याच्या पद्धतींत काय होणार आहे? ७०% मतदारांना महिला उमेदवारांना मते द्यायची संधीही मिळणार नाही. महिलांचे जणू वेगळे महिलास्थान तयार करायला सरकार निघाले आहे!

चिठ्ठ्यांच्या पद्धतीचा आणखी एक मोठा गंभीर परिणाम होणार आहे. काही होतकरू कार्यकर्ते परिश्रमाने एखाद्या मतदार संघात काम करून तयारी करतात. निवडणुका तोंडावर आल्यावर सरकार जाहीर करणार की ही जागा राखीव आहे. म्हणजे त्या उमेदवाराने केलेले सगळे कार्य वाया जाणार आणि चांगले उमेदवार नाउमेद होणार. चिठ्ठी पद्धतीचा याहूनही सर्वात भयंकर असा एक परिणाम आहे. यावेळी निवडून आलेल्या ३०% महिला सदस्यांना पक्के ठाऊक असणार की पुढच्या निवडणुकीत त्यांचा संघ सर्वसाधारण ठरणार. म्हणजे त्यांच्या मतदार संघात उमेदीने काम करण्याची त्यांची इच्छाच संपणार. ७०% पुरुष सदस्यांची परिस्थिती तशीच. पुढच्या निवडणुकांत त्याच मतदारसंघातून पुन्हा उभे राहण्याची शक्यता त्यांच्यापैकी फक्त निम्म्या सदस्यांनाच असणार. पण कोणा निम्म्या सदस्यांच्या वाट्याला हे भाग्य येणार हे माहिती नसल्याने सगळेच्या सगळेच गळबटून जाणार हे उघड आहे. चिठ्ठ्यांच्या पद्धतीने महिलांसाठी ३०% राखीव जागांची निवड हा शासनाने पंचायत राज्य नेस्तनाबूत करण्याची आखलेली योजना आहे.

महिला आघाडीने खूप प्रयत्न केले. शासनाला पर्यायी योजना दिली. एका मंडलात एक जिल्हा परिषदेची आणि दोन पंचायत समित्यांच्या अशा तीन जागा असतात. या तीनांपैकी एक जागा क्रमाक्रमाने राखीव ठरवल्यास चिठ्ठी पद्धतींतील सर्व दोष दूर होतात हे सविस्तरपणे सांगितले. पण शासन जरासुद्धा ऐकायला तयार नाही.

राज्यकर्त्यांचा डावपेच स्पष्ट आहे. महिलांकरिता जागा राखीव ठेवण्याची त्यांची भावनाच खोटी आहे. कोणता मतदार संघ राखीव आहे अथवा बिगरराखीव याचे त्यांना काहीच भलेबुरे सोयरसुतक नाही. मतदार संघ बिगरराखीव असला तर टग्या पुढारी उभा राहणार. महिलांकरिता राखीव असला तर त्याच पुढाऱ्यांची, घरांतील एखादी मायबहिणी कळसुत्री बाहुलीसारखी उभी करणार. कामकाजात काही फरक नाही. खाबूगिरीत बाधा नाही. महिला आंदोलनाचा असा बोजवारा करण्याचा शासनाचा इरादा आहे.

भरीत भर म्हणून शासनाने आणखी एक मनाचा कोतेपणा दाखवला. शेतकरी महिला आघाडीला राखीव चिन्ह द्यायला नकार दिला. डाव असा की महिला आघाडीची काही मते तरी बाद होऊन जावीत.

पुऱ्या तेरा वर्षांनी निवडणूक होते आहे. पण ही काही खुली लोकशाही लढत नाही. आपल्या पैलवानाला सोयीचा होईल असा तयार केलेला हा आखाडा आहे.

असल्या बनावट सामन्यांच्या मैदानांतही उतरायचे शेतकरी महिला आघाडीने ठरवले आहे. महिलांसाठी राखीव असलेल्या सगळ्या जागा, म्हणजे ३०% जागा महिला आघाडीच्या क्रियाशील कार्यकर्त्या लढवणार आहेत. काही थोडया सर्वसाधारण जागासुद्धा आघाडी लढवेल. निर्णय मोठा धाडसाचा आहे. शेतकरी महिला आघाडी हा काही पक्ष नव्हे. तिच्या मागे ना सत्तेचे पाठबळ ना पैशाचे. महिलांच्या जागृतीच्या आणि असंख्य शेतकरी पुरुषांच्या पाठबळाच्या भरवशावर महिला आघाडीने हा निर्णय घेतला आहे.

खरे म्हटले तर शेतकरी महिला आघाडीखेरीज कोणा इतर संघटनेला किंवा पक्षाला महिलांच्या राखीव जागा लढवण्याचा काही अधिकारच नाही. या निवडणुकांसाठी आघाडीने आपला तपशीलवार जाहीरनामा प्रसिद्ध लगेच करून टाकला. त्यात काहीच अडचण आली नाही. कारण आघाडीचा महिलांसंबंधीचा विचार आणि कार्यक्रम सुस्पष्ट आहे. इतरांना जाहिरनाम्यांत काय लिहावे याचीच पंचाईत पडली आहे.

गेली सहा वर्षे सातत्याने आघाडीने ग्रामीण महाराष्ट्रांतील महिलांत अभूतपूर्व जागृती घडवून आणली आहे.

महिलांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी चांदवड आणि अमरावती येथे अतिप्रचंड उपस्थितीची अधिवेशने भरवली. जिल्ह्याजिल्ह्यांत संमेलने केली.

ज्यांनी सूर्य पाहू नये आणि ज्यांना सूर्याने पाहू नये अशा भल्या घरच्या महिला गावोगाव, राज्यभर आणि इतर राज्यांतही जाऊन आघाडीची बांधणी करू लागल्या.

दारु म्हणजे सगळ्या स्त्रियांच्या संसारांत माती कालवणारी अवदसा. आणि गावांतील दारूचे दुकान म्हणजे पुढाऱ्यांचा अड्डा. या दुकानांना बंद करण्याचे आंदोलन आघाडीने प्रखरपणाने चालवले. शासन नमले. ज्या गावांतील पंचायत दारूचे दुकान बंद करण्याचा ठराव करील तेथे त्याचा अंमल होइल असे सरकारने मान्य केले. पण प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र शून्य. अंमलबजावणी होइल कशी? दारुची दुकाने बंद झाली तर पुढाऱ्यांचे प्राणच जातील ना!

आघाडीचा सर्वांत क्रांतिकारी कार्यक्रम म्हणजे लक्ष्मीमुक्तीचा. सीतामाईच्या काळापासून स्त्रियांच्या नावाने कधी मालमत्ता झाली नाही. घरांतल्या पाळीव जनावरांप्रमाणे स्त्रिया राहिल्या. मालकाने लाथ मारून हाकलले तर त्यांची स्थिती बेवारशीच. सीतामाईसारखी. गेल्या १५ महिन्यांत महाराष्ट्रांतील २ लाख स्त्रियांच्या नावाने जमिनी लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमामुळे झाल्या.

१० नोव्हेंबर १९९१ ला शेगांव येथे शेतकरी मेळावा झाला. चतुरंग शेतीच्या कार्यक्रमांत स्त्रियांना अग्रमानाचे स्थान देण्यांत आले आहे. नव्या शेतीचे जिवंत तंत्रज्ञान प्रयोगांनी तयार करण्याची जबाबदारी "सीता शेती" कार्यक्रमाने शेतकरी महिलांकडे दिली आहे.

शेतमालावर प्रक्रिया करून चढता भाव मिळवण्याचा माजघर शेतीचा कार्यक्रम. त्याचीही

जबाबदारी शेतकरी महिला आघाडीने स्वीकारली आहे.

महिलांची, महिलांसाठी झटणारी ग्रामीण महाराष्ट्रांत आज एकच एक संघटना आहे ती म्हणजे शेतकरी महिला आघाडी. निवडणुकांपासून ती दूर राहिली तर महिलांच्या प्रश्नाची ज्यांना समज नाही, कळकळ नाही अशा कळसूत्री बाहुल्या राखीव जागांवर जाऊन पडतील आणि त्यामुळे महिला आंदोलनाचे प्रचंड नुकसान होईल. महिला आघाडीला जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लढवण्या पलिकडे पर्यायच नव्हता. महिलांशी आघाडीचे अतूट नाते आहे. निवडणुकांमुळे हे नाते तुटणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

कोणी विचारेल मग महिला आघाडी ३०% जागाच का लढवत आहे? चांदवड अधिवेशनांत ठरल्याप्रमाणे सगळ्या १००% जागा का लढवत नाही? या प्रश्नाचे उत्तर उघड आहे. जेव्हा राखीव जागा नव्हत्या तेव्हा सर्वच्या सर्व जागा लढवायला काही प्रत्यवाय नव्हता, पण ३०% जागा राखीव झाल्याने परिस्थिती बदलते. बिगरराखीव जागाही महिला आघाडीने लढवल्या असत्या तर पुरुषांच्या मनांत विनाकारण विरोध आला असता. अशा विरोधाने कोणाची हौस भागत असेल तर गोष्ट वेगळी. पण महिलांचे व आंदोलनाचे त्याने काहीच भले होणार नाही. नुकसानच होईल. शिवाय ज्या बिगरराखीव मतदारसंघात विशेष कर्तृत्ववान समर्थ महिला उमेदवार उपलब्ध असेल तेथेही आघाडी निवडणुका लढवणार आहेच.

या निवडणुका लढवून आघाडीला साध्य काय करायचे आहे? महिला आघाडीच्या जाहिरनाम्यांत या प्रश्नाची व्यापक चर्चा आहे. त्याचा सारांश येथे सांगतो.

दारु दुकान बंदी आणि स्त्रियांच्या मालमत्तेवरील हक्काचा प्रश्न महिला आघाडीने आजपर्यंत हिरीरीने मांडला आहे. तामीळनाडूप्रमाणे महाराष्ट्रांतही सर्व दारुची दुकाने बंद व्हावीत हा आघाडीचा आग्रह आहे.

शेतकरी महिलांना व्यापक मालमत्तेचा अधिकार असणारा महाराष्ट्र हा सर्व जगांत पहिला प्रदेश व्हावा ही आघाडीची महत्त्वाकांक्षा आहे.

"सीता शेती", "माजघर शेती" या स्वयंभू कार्यक्रमांतून महिलांना स्वयंसिद्धा बनवावे हा महिला आघाडीचा निश्चय आहे.

स्वयंसिद्ध बनलेल्या महिलांनी यवतमाळ जिल्ह्यांतील रावेरी गावी "स्वयंसिद्धा सीतेचे" मंदिर बांधून जगभरच्या स्त्रियांना एक प्रेरणास्थान तयार करावे असा महिला आघाडीचा संकल्प आहे.

पण या पलिकडे जाऊन पंचायत राज्य व्यवस्थेमार्फत विकासाचा एक अगदी वेगळा कार्यक्रम राबवण्याचे महिला आघाडीने ठरवले आहे.

महात्मा गांधींनी सर्व आर्थिक सामाजिक धोरणांसाठी एक महत्त्वाचे सूत्र सांगितले. कोणतेही धोरण चांगले का वाईट कसे ठरवावे ? समाजांतील जो सर्वात दुर्बल पीडित मनुष्य असेल त्याच्यावर त्या धोरणाचा परिणाम काय होईल असा प्रश्न विचारावा. जर त्या शेवटच्या पायरीवरील मनुष्याच्या आयुष्यांत काही सुधारणा होणार असेल तर ते धोरण योग्य; अन्यथा अयोग्य असा हा महात्माजींचा मंत्र. दीनदुबळ्यांच्या डोळ्यांनी पहायला शिका, दांडग्याच्या नाही असा त्याचा थोडक्यात अर्थ.

महिला आघाडीच्या जाहीरनाम्यात हेच तत्त्व स्वीकारले आहे. थोड्या फरकाने. सर्वात दीन पीडित स्त्रीच्या दृष्टीकोनातून विकासाच्या कार्यक्रम तपासला गेला पाहिजे असे हे नवे सूत्र आहे.

या सूत्राचा व्यवहारात काय अर्थ लागतो ?

उदाहरणार्थ, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न घ्या. स्वातंत्र्यानंतर ४५ वर्षांनी लाखो गावांना आज पिण्याचे पाणी नाही. डोक्यावर हंड्यांच्या उतरंडी वाहत मैलच्या मैल बायका दिवसामागून पाणी भरत आहेत.

पाण्याचे नियोजन करणारी मंडळी, त्यांना कधी अशी उतरंड उचलावी लागली नाही. त्यांना पाणी वाहणाऱ्या स्त्रीच्या काबाडकष्टांचे काय होय? त्यांच्या योजना भव्य दिव्य. धरणे, कालवे, तळी, टांक्या. नोकरशहांच्या फायद्याच्या, कंत्राटदारांच्या लाभाच्या आणि पुढाऱ्याच्या सोयीच्या. पाण्याच्या नियोजनाचे काम पाणी वाहणाऱ्या एखाद्या बाईकडे असते तर ती म्हणाली असती, "गावांत एवढ्या उंच खर्चिक टाक्या बांधायची काय गरज आहे. जेथून बाया पाणी भरतात तिथून मोटर इंजिन लावा, गावांतल्या दोनचार नळांच्या कोंडाळ्यांना तास दोन तास पाणी आले म्हणजे बायांच्या डोळ्यांतलं पाणी खळेल. बस. बाकीच्या बांधकामांची काही घाई नाही."

स्त्रियांचा दृष्टिकोन असा अनेक बाबतीत वेगळा असू शकतो.

प्राथमिक आरोग्य केन्द्रात बाईला आणतात, आणली तर, बाळंतपणासाठी किंवा अगदीच मरणासन्न झाली म्हणजे. काय उपयोग बाई माणसांना तिथल्या डॉक्टरांचा आणि बाकी सर्व साधनांचा? त्याच्यापेक्षां गावांतल्या सुईणीला थोडे प्रशिक्षण देऊन अधिक कुशल केली असती तर बायांना केवढा आधार झाला असता !

मुलींना आधीच शाळेत पाठवायला शेतकरी आई बापे तयार नसतात. गावांत जितकी शाळा असेल तितकी पुरी झाली तरी मोठी नवलची गोष्ट. गावची शाळा संपली म्हणजे दूरच्या गावी पुढच्या शिक्षणासाठी मुलांना पाठवतात. मुलींना क्वचितच. गावच्या छोट्याशा शाळेत गुरूजी येतातच. त्यांच्याकडून मुलींच्या शिकवण्याची सोय गावातल्या गावात सहज करता येईल.

पण लक्षांत कोण घेतो ?

महिलांच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधून घ्यावे, स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा मान मिळवून द्यावा हेच शेतकरी महिला आघाडीचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच शेतकरी महिला आघाडी महिलांच्या राखीव जागा लढवत आहे.

सर्व महिलांकडून आणि शेतकरी भावाकडून अपेक्षा काय?

**राखीव जागांवर शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणा.**

**पुढाऱ्यांच्या बाहुल्यांना मते देऊ नका.**

**शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांना राखीव चिन्ह दिलेले नाही. आपल्या मतदार संघांतील शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांची खूण नीट माहीत करून घ्या.**

**शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांच्या सहाय्यासाठी शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही बिगरराखीव जागी उभे आहे. त्यांनाही विजयी करा.**

●●●

# शेतकरी संघटनेचे आठ फेब्रुवारीचे रास्ता रोको आंदोलन

## ● भूमिका ●

देशापुढे उभ्या असलेल्या परकीय कर्ज व आर्थिक समस्येतून आता शेतकरीच देशाला वाचवू शकेल असे सरकार वारंवार कबूल करीत असतांना त्यासाठी आखलेल्या नवीन मुक्त आर्थिक धोरणाचा फायदा शेतकऱ्यांना मिळू नये अशा हालचाली शासन करीत आहे. याचा निषेध करण्यासाठी शेतकरी संघटना ८ फेब्रुवारी १९९२ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रभर 'रास्ता रोको' आंदोलन करणार आहे.

हा निर्णय शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने जळगाव येथे २५ जानेवारी १९९२ रोजी झालेल्या बैठकीत घेतला.

१० नोव्हेंबर १९९१ रोजी शेगाव येथे झालेल्या मेळाव्यात शेतकऱ्यांनी सरकारच्या नवीन मुक्त आर्थिक धोरणाचे स्वागत करून शेती एक सक्षम आर्थिक व्यवसाय म्हणून करण्यासाठी सीताशेती, माजघर शेती, व्यापार शेती व निर्यातशेती असा चतुरंग शेतीचा कार्यक्रम येत्या दशकात राबविण्याचे ठरविले होते. सरकारच्या नवीन मुक्त आर्थिक धोरणात हे कार्यक्रम अमलात येणे शक्य होणार आहे. पण, सध्या सरकारने गहू, कापूस व खाद्यतेलाच्या आयातीसंबंधी जे निर्णय घेतले आहेत त्यामुळे सरकार स्वतःच जाहीर केलेल्या मुक्त आर्थिक धोरणाशी कितपत प्रामाणिक आहे याबद्दल शंका निर्माण झाली आहे. या धोरणासंबंधी शासनाने आजपर्यंत जे जे निर्णय घेतले ते पाहात हे मुक्त आर्थिक धोरण शेतकऱ्यांसाठी नसून कारखानदारांसाठीच स्वीकारले असावे असे दिसते. थोडक्यात, भारत-इंडिया द्वैत या नवीन मुक्त आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीतही कायम ठेवले आहे.

दिल्ली येथे १८, १९ जानेवारी १९९२ रोजी देशातील अ-राजकीय शेतकरी संघटनांच्या किसान समन्वय समितीच्या बैठकीत सरकारच्या या पक्षपातीपणाचा निषेध करण्यात येऊन 'रास्ता रोको आंदोलना' चा निर्णय घेण्यात आला. किसान समन्वय समितीच्या बैठकीला पंजाब, हरियाणा, गुजरात, आंध्रप्रदेश, तामीळनाडू, बुंदेलखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, व महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. सर्व राज्यांमध्ये हे रास्ता रोको आंदोलन होणार असून या प्रतिकात्मक आंदोलनाचा परिणाम मुक्त आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये येत्या अंदाजपत्रकी अधिवेशनाआधी दिसून आला नाही तर १७, १८ मार्च १९९२ रोजी चंदीगढ येथे होणाऱ्या किसान समन्वय समितीच्या बैठकीत देश पातळीवर शेतकऱ्यांचे प्रखर आंदोलन उभे करण्याचा निर्णय व आराखडा तयार करण्यात येईल.

सध्याच्या शासनाने मुक्त आर्थिक धोरणाची घोषणा केल्याने शेतकऱ्यांच्या मनांत ज्या आशा पालवल्या होत्या त्या शासनाच्या शेतीविरोधी कारवाईने धुळीस मिळाल्या आहेत. यासंबंधी पुढील मुद्दे शासनाच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न म्हणजे हे प्रतिकात्मक आंदोलन आहे.

**(१) शेतीमालावर प्रक्रिया करण्यासंबंधात शेतकऱ्यांवर असलेले सर्व निर्बंध दूर करावे.**

उदाहरणार्थ,

(क) भात उत्पादक शेतकऱ्यांना भात भरडून विक्रीकरता तांदूळ तयार करण्यास बंदी आहे. लेव्ही वसूलीच्या सोयीसाठी घातलेली ही बंदी मुक्त अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेशी विसंगत आहे;

(ख) शहरांना दूध स्वस्त भावात मिळावे म्हणून दूध-उत्पादक शेतकऱ्यांवर दुग्धजन्य पदार्थ बनविण्यावर बंदी आहे.

(ख) फळ उत्पादक शेतकऱ्यांना 'वाईन' बनविण्यास परवानगी नाही.

तसेच,

– प्रक्रियेसाठी शेतजमिनीचे 'बिगर शेती' करण्यातील सर्व अडथळे दूर झाले पाहिजेत.
– शेतीसाठी घेतलेली वीज शेतकऱ्यांना प्रक्रियेसाठी वापरण्याची परवानगी असावी.
– शेतीमाल व त्यावर आधारित तयार मालाच्या व्यापारासाठी कोणत्याही प्रकारचे 'व्यापारी संगठन' निवडण्याचे शेतकऱ्यांना स्वांतंत्र्य हवे, फक्त 'सहकारी संस्थां' चा एकमेव पर्याय त्यांच्यावर लादू नये.

**(२) शेतीमाल व तयार मालाच्या निर्यातीवरील सर्व निर्बंध दूर व्हावेत.**

निर्यातीच्या क्षेत्रात शेतकऱ्यांची स्थिती अधिकच विवशतापूर्ण आहे. शेतीमालाच्या निर्यातीसाठी अनुदान मिळण्याची गोष्ट तर दूरच; उलट शेतीमालाच्या निर्यातीत अनंत अडचणी निर्माण केल्या जातात; अगदी निर्यातबंदीपर्यंत. देशामधील शेतीमालाचे भाव पाडणे हाच यात शासनाचा उद्देश असतो. निर्यातीच्या क्षेत्रात कारखानदारीची आजवरची कामगिरी अत्यंत निराशाजनक आहे हे उघड दिसत असतांनासुद्धा परकीय चलनाचे गंभीर संकट डोक्यावर असलेल्या देशाचे शासन देशाला या संकटातून वाचविण्याची क्षमता असणाऱ्या शेतीक्षेत्राचा विचारसुद्धा मनात न आणता अजूनही त्याच अकार्यक्षम कारखानदारीला निर्यातीसाठी अतिरिक्त सोयी-सवलती देऊ करीत आहे ही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. आयात्‌निर्यातीमधील असंतुलनाच्या दीर्घ काळ चालत आलेल्या या समस्येतून देशाला बाहेर काढण्याची क्षमता फक्त शेतीक्षेत्रातच आहे. आणि हे लक्षात घेता कापसाच्या निर्यातीसाठी ठोस परिणामकारक पावले न उचलणे या गोष्टींवरून हेच सिद्ध होते की सरकार देशहिताचा विचार बाजूला ठेवून फक्त कारखानदारीचेच संरक्षण करू इच्छित आहे.

निर्यातीच्या क्षेत्रात खरीखुरी 'मुक्त व्यवस्था' आणण्यासाठी पुढील पावले उचलायला हवीत.

– शेतीमाल व त्यावर आधारित वस्तूंच्या निर्यातीबाबत आजपर्यंत दिली गेलेली सावत्र वागणूक सोडून द्यावी. निर्यात 'मुक्त प्रमाणपत्र पद्धती' किंवा 'वार्षिक कोटा पद्धती' ने केली जावी.
– तुटीच्या उत्पादनाच्या वर्षीसुद्धा निर्यात करावयाचा 'किमान कोटा' निश्चित केला पाहिजे. निर्यात बाजारपेठेतील विश्वासार्हता टिकविण्यासाठी हे आवश्यक आहे.
– निर्यात करणाऱ्या औद्योगिक संस्थांना दिल्या जाणाऱ्या सोयी सवलती एकाच ठिकाणी एकाच खिडकीवर उपलब्ध व्हाव्यात.

शेतकरी आता सरकारकडे काही वाढीव सोयी सवलती मागत नसून शासनाने आजपर्यंत शेतकरी विरोधी जी पक्षपाती भूमिका बजावली ती बंद करण्याचे आवाहन करीत आहेत. मुक्त आर्थिक धोरणांचे नाव घेत शासनाने जर भारत-इंडिया द्वैत कायम ठेवण्याचा प्रयत्न चालू ठेवले तर शासनाच्या या दुतोंडीपणाचा देशातील शेतकरी अहिंसात्मक सत्याग्रहाच्या मार्गाने सर्व शक्तीने विरोध करतील.

**शे. सं. मध्यवर्ती कार्यालय**

# शेतकरी महिला आघाडी पंचायत राज्य निवडणुकांसाठी सज्ज

दि. २५ फेब्रुवारी १९९२ रोजी होऊ घातलेल्या जि. प. व. पंचायत समित्या यांच्या निवडणुका लढविण्याची शेतकरी महिला आघाडीची तयारी पूर्ण झाली असून या तयारीवर २४ जानेवारी रोजी जळगाव येथे झालेल्या शेतकरी महिला आघाडीच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

मुळात, महिलांसाठी राखीव जागा ही कल्पनाच शेतकरी महिला आघाडीस अमान्य आहे. त्या उप्पर ज्या ३० टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत त्या ठरविण्याच्या शासनाच्या चिठ्ठी पद्धतीस शेतकरी महिला आघाडीचा विरोध आहे. तरीही, शेतकरी महिला आघाडीने या निवडणुका लढविण्याचे ठरविले आहे.

एकूण १६ जिल्ह्यांत जि. प. व पंचायत समित्यांच्या सुमारे ४०० मतदार संघांत शेतकरी महिला आघाडी उमेदवार उभे करणार असून या महिला उमेदवारांना प्रचारकार्यात साहाय्यकारी ठरून प्रचारकार्य सुलभ व्हावे यासाठी त्या त्या मतदार संघांशी संलग्न मतदार संघांतून शेतकरी संघटनेचे ४०० पुरुष कार्यकर्ते अपक्ष उमेदवार म्हणून ही निवडणूक लढवतील.

शेतकरी महिला आघाडीला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात प्रचंड पाठबळ आहे हे शेतकरी महिला आघाडीच्या अधिवेशनांतील, सभासंमेलनांतील तसेच आंदोलनांतील महिलांच्या मोठ्या संख्येच्या उत्स्फूर्त सहभागाने सिद्ध झालेले आहे. या पाठबळाच्या आधारावर शेतकरी महिला आघाडीने महाराष्ट्र शासनाकडे गेल्या वर्षभरापूर्वीपासूनच स्वतंत्र राखीव निवडूक चिन्हाची मागणी केली आहे. २६ जानेवारी १९९२ रोजी औरंगाबाद येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांनी असे चिन्ह देण्याचे शेतकरी महिला आघाडीच्या शिष्टमंडळासमोर मान्य केले आहे. हे चिन्ह मिळविण्यासाठी आमदार सौ. सरोज काशीकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी महिला आघाडीचे एक शिष्टमंडळ ५ फेब्रुवारी १९९२ रोजी मुंबईत मुख्यमंत्र्यांची पुन्हा भेट घेणार आहे.

या निवडणुकीत शेतकरी महिला आघाडीच्या प्रचारयंत्रणेची बांधणी करण्यासाठी शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांच्या महाराष्ट्र दौऱ्याची एक फेरी पूर्ण झाली असून प्रत्येक जिल्ह्यात एक एक निवडणूक प्रमुखाची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, मराठवाड्यासाठी नांदेड, विदर्भासाठी वर्धा व पश्चिम महाराष्ट्रासाठी पुणे अशी विभागीय कार्यालयेही सुरू करण्यात आली आहेत.

**सौ. सुमन अग्रवाल**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

## अमरावती जिल्हा शेतकरी संघटना कृतिसमिती

शेतकरी संघटनेचे अमरावतीचे जिल्हा प्रमुख श्री. संजय कोल्हे यांनी जिल्ह्यासाठी कृतिसमितीचे गठन केले असून सर्वश्री राजाभाऊ पाटील पुजदेकर (पुजदा), जगदीश बोंडे (साऊर), प्रा. कमल करवा (अमरावती), विलास पाटील चोपडे (नांदगाव खं.), रमेश कुथे (अंजनगाव), प्रमोद कुटे (काटी) व सौ. आशा तरार (शेंदुर्जना घाट) हे या समितीचे सदस्य आहेत. लवकरच जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या प्रमुखांची नियुक्ती केली जाईल.

१२६. मजले वि. का. स. (विकास) सेवा सोसायटी लि. मजले (कोल्हापूर)
१२७. श्री शारदा सह. दूध व्याव. संस्था. म., माणगाव (कोल्हापूर)
१२८. श्री महावीर को-ऑप. बँक लि. कोल्हापूर
१२९. प्रा. राजीव बसर्गेकर, पुणे
१३०. श्री. दीलीप शंकरराव घावडे, माणिकवाडा (यवतमाळ)
१३१. कोपरगाव बागायतदार सह. सोसा. लि. कोपरगाव (अहमदनगर)
१३२. श्री. विजय लोडम, आरखेड (अकोला)
१३३. डॉ. नीळकंठ काळे, भिमणी (चंद्रपूर)
१३४. युनियन सह. दूध व्याव. संस्था म., माणगाव (कोल्हापूर)
१३५. चेअरमन, आळते छत्रपती वि.का.स. (विकास) सेवा संस्था म., आळते (कोल्हापूर)
१३६. श्री. गजानन दिवाणजी पावडे, उमरी (वर्धा)
१३७. श्री. खेत्री पा. वाग्दरकर, विठ्ठलवाडा (चंद्रपूर)
१३८. माणगाव विकास सेवा संस्था म., माणगाव (कोल्हापूर)
१३९. श्री. गुरुदेव शंकर पा. गायकवाड, तांडा (कोल्हापूर)

# कृषिप्रशिक्षण व सुविधा महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला हव्या

**जगामधील सर्वच विकसनशील व अविकसित देशामधल्या महिला शेतकऱ्यांचे प्रश्न मूलभूत पातळीवर आपल्या देशातल्या सारखेच आहेत. त्या भागातील महिला शेतकऱ्यांना त्यांचे काम कमी कष्टाचे आणि जास्त फलदायी व्हावे म्हणून कशा तऱ्हेने प्रशिक्षणाचे नियोजन करावे लागेल याचे संशोधन आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक बँकेच्या तज्ञ श्रीमती कॅट्रीन सायटो या इंग्रज भगिनीने केले आहे. "शेतकरी संघटक" च्या वाचकांना हे संशोधन उद्‌बोधक वाटेल अशा कल्पनेने त्याचा सारांश येथे दिला आहे.**

---

जगातल्या विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये प्रत्यक्ष शारीरिक कष्ट आणि अनेक बाबतीत निर्णय घेण्याची क्षमता या दोन्ही बाबतीत स्त्रियांचे स्थान नेहमीच फार महत्त्वाचे राहिले आहे. एकूण उत्पादनापैकी किमान ७० टक्के उत्पादन स्त्रियांच्या प्रत्यक्ष सहभागाने निर्माण होते एवढेच नव्हे तर या व्यवसायाशी निगडित असलेल्या विक्री, प्रक्रिया, पशूपालन इत्यादी कामांमध्ये सुद्धा स्त्रियांचा फार मोठ्या प्रमाणावर हातभार लागतो.

खेड्यांतले पुरुष रोजगार मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने शहरांत जाऊ लागल्यामुळे, शेती व्यवसायातले स्त्रियांचे स्थान दिवसेंदिवस जास्तच महत्त्वपूर्ण होऊ लागले आहे. ते जास्त फलदायी होण्यासाठी स्त्रियांना योग्य ते प्रशिक्षण मिळणे जरूर आहे. परन्तु असे दिसून आले आहे की शासनांनी चालवलेली प्रशिक्षण प्रणाली जास्त करून स्त्रियांना वगळूनच चालवली जाते. हे हेतुतः केले जाते असे नाही तर त्या देशांतली सामाजिक परिस्थिती, रूढी रिवाज वगैरेंमुळे तसे होते. स्त्रियांच्या कष्टाबद्दलची आणि इतर अडचणींबद्दल एकूणच सर्वसाधारण अनास्था हे एक पारंपरिक कारण आहेच, पण त्याचबरोबर पुरुषांना दिलेले प्रशिक्षण साहजिकच हळुहळू स्त्रियांच्या पातळीपर्यंत झिरपत येईल अशी भ्रामक भावनाही याला काहीशी जबाबदार आहे.

अविकससित देशांतल्या शेतीव्यवसायाची सुधारणा करण्याच्या सर्वंकष उपाय योजनांसाठी जागतिक बँकेने सुमारे ५००० कोटी रुपये गुंतवले आहेत. परन्तु त्याचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही. शेतकामामधले त्यांचे महत्त्वपूर्ण स्थान स्त्रियांना साहजिकपणेच मिळावे यासाठीही काही उपाय अंगिकारले जात आहेत. स्त्रियांना कोणते तंत्रज्ञान जास्त उपयोगी ठरेल याचा मागोवा घेऊन त्याप्रमाणे प्रशिक्षणाचे स्वरूप ठरवणे आणि ते प्रशिक्षण कमी खर्चाचे पण जास्त उपयोगी होईल असे करणे हे या उपयांचे मुख्य भाग आहेत.

गेली जवळ जवळ दोन दशके संशोधन करून, जागोजागीचे किरकोळ फरक वगळता, असे दिसून आले आहे की आफ्रिका खंडाच्या दक्षिण भागामध्ये प्रत्यक्ष शारीरिक मेहनत आणि निर्णय घेण्याची क्षमता या बाबतीत स्त्रियांचे स्थान अनन्य- साधारण असूनसुद्धां, त्यांच्या काही विशिष्ट अडचणींमुळे एकूण प्रशिक्षण प्रणालीपासून शेतकरी स्त्रिया वंचितच रहातात. आणि परिणामतः, शेतीचे उत्पादन खालच्या पातळीवर रहाते. स्थूलमानाने त्यांच्या अडचणी जमिनीची मालकी नसणे, प्रशिक्षणाचा अभाव, पतपुरवठ्याची कमतरता, मोकळ्यावेळेचा अभाव सामाजिक रुढींची बंधने आणि अशिक्षितता अशा आहेत.

**जमीन :** जगाच्या मोठ्या भागामध्ये जमीन बहुधा कुटुंबप्रमुख पुरुषाच्या नावावर असते. स्त्रियांना कसण्यासाठी लहान लहान आणि दूरवर असलेले तुकडे दिले जातात. मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष न करता शेतकामासाठी दूर अंतरावर जाणे साहजिकच कष्टाचे होऊन बसते.

**प्रशिक्षण :** प्रशिक्षणाच्या अभावामुळे क्षमता कमी होते आणि अनुत्पादक कष्ट वाढत जातात. त्यामुळे प्रशिक्षणासाठी लागणारा उत्साह स्त्रियांमध्ये शिल्लक रहात नाही.

**पतपुरवठा :** बहुतेक विकसनशील देशांमध्ये स्त्रियांना पतपुरवठा अपवादानेच केला जातो. कारण शेतजमिनीची मालकी स्त्रीकडे बहुधा नसते. त्याचबरोबर त्यांची निरक्षरता, नोकरशाहीचा जाच आणि स्त्रियांबद्दलचा पारंपारिक दृष्टिकोन याही गोष्टी आड येतात. त्यामुळे प्रशिक्षण मिळूनही त्याचा उपयोग करण्याकरिता लागणारी आर्थिक गुंतवणूक त्यांना करता येत नाही.

**मोकळा वेळ :** स्त्रियांना सर्वसाधारणपणेच पुरुषांपेक्षा मोकळा वेळ कमी मिळतो. आणि मुलांच्या संगोपनाच्या जबाबदारीमुळे त्यांना हिंडण्याफिरण्याची मोकळीकसुद्धां कमी प्रमाणातच मिळते. त्यामुळे प्रशिक्षणासाठी आपल्या ठिकाणापासून दूरवर जाणे त्यांना जमत नाही. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने शेतात राबतातच आणि त्याशिवाय स्वयंपाक करणे पिण्याचे पाणी, सरपण आणणे ही जास्तीची कामेही त्यांना करावी लागतात. पाकिस्तानमध्ये शेतातली आणि घरातली कामे पुरी करण्याकरता स्त्रियांचे रोज १२ ते १५ तास खर्ची पडतात. प्रवासासाठी पैसे कमी पडणे, स्वतःचे वाहन नसणे याचबरोबर सामाजिक आणि धार्मिक बंधने यामुळे स्त्रियांच्या हालचालींवर (प्रवासावर) मर्यादा पडतात.

**सामाजिक रूढी :** सामाजिक रूढींच्या बंधनामुळे पुरुष प्रशिक्षक शेतकरी स्त्रियांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. ज्या देशांमध्ये 'पडदा' पाळला जातो तेथे तर ही अडचण जास्त तीव्रतेने भासते.

**शिक्षण :** बहुतेक अविकसित देशांत स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार फार कमी प्रमाणांत झालेला असल्यामुळे प्रशिक्षणाचा उपयोग त्यांना करून घेता येत नाही. हिदुस्थानामध्ये ग्रामीण भागातील ६० टक्के पुरुष तर ८० टक्के स्त्रिया निरक्षर आहेत.

ही परिस्थती सुधारण्यासाठी स्त्रियांबद्दलची संपूर्ण माहिती गोळा करण्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. स्त्रिया नेमके कोणते काम करतात, किती प्रमाणांत करतात, का करतात, शेतीबद्दलचे धोरणात्मक निर्णय स्त्रिया किती प्रमाणांत घेतात, भौगोलिक आणि स्थानिक वैशिष्ट्ये काय आहेत याबद्दलची विस्तृत माहिती असणे जरूर आहे.

अशा स्वरूपाची माहिती गोळा करण्याचे अनेक मार्ग आहेत. परन्तु प्रत्येक

खेड्यांत जाऊन तिथल्या शेतकऱ्यांशी आणि विशेषकरून महिला शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांना बोलते करणे हा सर्वात कमी खर्चाचा आणि कमी वेळ घेणारा मार्ग आहे.

अशा रीतीने जमवलेल्या सगळ्या माहितीचे योग्य वर्गीकरण करून आणि अभ्यास करून त्या आधारे शेतीव्यवसायाची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि ग्रामीण लोकसंख्येचे सुयोग्य पालनपोषण होण्यासाठी जरूर आणि उपयोगी असे तंत्रज्ञान निर्माण करता येईल. तसेच स्त्रियांना सुलभतेने वापरता येतील अशी सुधारित अवजारे आणि यंत्रेही तयार करावी लागतील.

प्रत्येक प्रदेशाची भौगोलिक आणि इतर वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्या त्या भागाला उपयोगी पडेल असे प्रशिक्षण तंत्र तयार झाले की ते महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा पुढचा आणि आव्हानात्मक असा टप्पा आहे.

महिला शेतकऱ्यांशी अधिक परिणामकारक संपर्क स्थापन करण्यासाठी पुरुष प्रशिक्षकांपेक्षा स्त्री प्रशिक्षिका जास्त उपयोगी पडतील हे स्पष्टच आहे. पण यासाठी स्त्री प्रशिक्षिकांची संख्या सुद्धा अर्थातच बरीच जास्त असायला पाहिजे. हे कसे काय शक्य होणार?

सध्या आफ्रिकन देशांत शेतकी शाळांतल्या विद्यार्थ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण फक्त १३ टक्के आहे. हे प्रमाण वाढवण्यासाठी माध्यमिक शाळांमधल्या आणि त्यामार्गे शेतकीशाळामधल्या विद्यार्थिनींना फीमध्ये सवलत, वसतीगृहांमध्ये सवलतीच्या दरात रहाण्याची सोय वगैरे सारख्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. अशा शेतकी शाळांमधून बाहेर पडलेल्या स्त्रियांना लग्न झाल्यानंतर नोकरीवरून काढणे वगैरे सारख्या जाचक अटीपासून मुक्त करावे लागेल आणि इतरही सोयी सवलती पुरवाव्या लागतील.

असे सर्व उपाय वापरून स्त्री प्रशिक्षिकांची संख्या वाढवली तरी पुरुष प्रशिक्षकांचे संख्याबल जास्तच रहाणार आहे हे उघडच आहे. त्यामुळे पुरुष प्रशिक्षकांच्या दृष्टीकोनांत बदल घडवून आणणे हे फार महत्त्वाचे आहे. पुरुष प्रशिक्षक स्त्री शेतकऱ्यांकडे त्या स्वयंसिद्ध शेतकरी आहेत हे लक्षांत न घेता पुरुष शेतकऱ्यांच्या कारभारणी आहेत अशा भावनेतून बघतात, ते बदलले पाहिजे.

स्त्री शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरतासुद्धां एक एकट्या महिलांना असे शिक्षण देण्यापेक्षा महिलांच्या स्थानिक गटांना शिक्षण देणे जास्त उपयोगी ठरते. अनेक अविकसित आणि विकसनशील देशांत असे स्त्रियांचे स्थानिक गट नेहमीच सहकारी पद्धतीने कामे करीत असतात. त्यामुळे अशा महिलांच्या गटांना प्रशिक्षण दिले तर ते जास्त सोप्या रीतीने आत्मसात केले जाईल. त्यानंतरसुद्धां महिला गटांमधल्या खऱ्या सहाकारामुळे त्यांना कर्ज पुरवठा वगैरे सुद्धा जास्त सुलभतेने मिळू शकेल.

प्रशिक्षिका आणि स्त्री शेतकरी यांच्यात संपर्क साधून देणारा दुवा म्हणून स्त्री प्रचारिकांचा उपयोग करून घेता येण्यासारखा आहे. स्थानिक पुढारी, टोळ्यांचे, जमातींचे नायक यांच्या प्रोत्साहनामुळे अशा प्रचारिकांची संख्या वाढू शकेल.

अशा प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष लाभ महिला शेतकऱ्यांना मिळेल याची व्यवस्था करणे जरूरीचे आहे. शेतातले काम आणि घरगुती जबाबदाऱ्या यांच्या चक्रव्यूहातून महिला शेतकऱ्यांना प्रशिक्षणासाठी मोकळीक मिळणे खरोखरच कठीण आहे. फिरते प्रशिक्षक हा कदाचित एक मार्ग असू शकेल. परन्तु रेडिओ आणि टेलीव्हिजन यांचा उपयोग जास्त दूरगामी ठरेल असे सध्याचे एकूण वातावरण आहे. या सर्व साधनांचा जरूर तसा कमी अधिक प्रमाणांत उपयोग करून घेतला तर महिला शेतकऱ्यांचे प्रशिक्षण अधिक परिणामकारक ठरेल.

मूळ लेख आंतरराष्ट्रीय नाणेनिधीतर्फे प्रकाशित Finance and Development त्रैमासिकाच्या सप्टेंबर १९९१ च्या अंकात प्रकाशित झाला आहे.
लेखाचे शीर्षक : Extending Help to Women Farmers in LDCs — Katrine A. Saito
मराठी सारांश : श्री. गोपाळराव परांजपे, पुणे.

# शेतकऱ्यांना उद्योगस्वातंत्र्य हवे

**— शरद जोशी**

शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी दिल्लीमध्ये केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी २३ जानेवारी १९९२ रोजी बोलाविलेल्या अंदाजपत्रकपूर्व चर्चाबैठकीस हजर होते. शरद जोशींनी या बैठकीत किसान समन्वय समितीच्या वतीने शेतकऱ्यांची भूमिका मांडली. त्यांनी शेगावच्या जाहिरनाम्याची माहिती देवून शेतकरी आता स्वतःच्या बुद्धीने सीताशेती, माजघर शेती, व्यापार शेती व निर्यात शेती अशी चतुरंग शेती करून शेतीमालाल भाव तर मिळविणार आहेच पण त्यातून देशाची डबघाईला आलेली आर्थिक स्थिती सावरण्यासही मदत करणार आहे असे अर्थमंत्र्यांना सांगितले. मात्र त्यासाठी, शासनाने शेतकऱ्यांच्या उद्योग व व्यापार स्वातंत्र्याच्या आड येणारी आपली धोरणे सोडून दिली पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादन केले. शेती, प्रक्रिया, व्यापार व निर्यात या बाबतीत शेतकऱ्यांना जाचक अशा सरकारी धोरणांची अनेक उदाहरणे देऊन श्री. शरद जोशींनी अर्थमंत्र्यांपुढे शेतकरी आंदोलनाच्या शासनाकडून ज्या अपेक्षा आहेत त्या पुढील प्रमाणे मांडल्या.

१. शेतीमालावर प्रक्रिया करण्यावरील निर्बंध दूर करावे.
२. शेतीमालाच्या निर्यातीवरील बंधने रद्द करावी.
३. देशांतर्गत शेतीमाल व्यापारावरील बंधने उठवावी.
४. प्रक्रिया, व्यापार, निर्यात इत्यादी संघटित रित्या करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी ते सहकारी संस्थेच्याच रूपाने केले पाहिजे असे बंधन असू नये.

येत्या अंदाजपत्रकी अधिवेशनात या दृष्टीने आर्थिक धोरणात आवश्यक ते बदल होतील आणि शेतकऱ्यांना आपल्या उद्योगस्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याची पाळी येणार नाही अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th February, 1992

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
February 6, 1992

To

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

# ९ फेब्रुवारीपासून श्री. शरद जोशींचा सुधारित दौरा

| दिनांक | जिल्हा |
|---|---|
| ९, १० फेब्रुवारी | नागपूर |
| ११, १२ फेब्रुवारी | चंद्रपूर |
| १३, १४ फेब्रुवारी | वर्धा |
| १५ फेब्रुवारी | यवतमाळ |
| १६ फेब्रुवारी | अकोला |
| १८ फेब्रुवारी | जळगाव |
| १९ फेब्रुवारी | धुळे |
| २० फेब्रुवारी | नाशिक |
| २१, २२, २३ फेब्रुवारी | परभणी व नांदेड |

दौऱ्याच्या या टप्प्यामध्ये श्री. शरद जोशी त्या त्या जिल्ह्यात जिल्हा परिषदा व पंचायत समिती यांच्या निवडणुकीमध्ये शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवार उभ्या असलेल्या मतदार संघातील ज्या गावांनी लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम अमलात आणून किमान १०० महिलांना जमीनमालकी दिली आहे त्यापैकी काही गावी लक्ष्मीमुक्ती ग्रामगौरव समारंभात हजर राहून शेतकरी महिला आघाडीचा जाहीरनामा, शेतकरी महिला आघाडीची निवडणुकीतील आवश्यकता या संबंधी विस्तृत विवेचन करतील. या दौऱ्यात त्यांच्यासोबत शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ. सुमनताई अग्रवाल आणि इतर कार्यकर्त्याही सहभागी असतील.

• • •

**आजवर घरातील अंधारात कोंडून ठेवलेल्या मायबहिणींच्या आडून आपले भ्रष्टाचारी राजकारण चालू ठेवण्याची संधी पुढाऱ्यांना देऊ नका**

**महाराष्ट्रभरच्या ग्रामीण महिलांचे सर्वंकष प्रतिनिधित्व करणारी एकमेव संघटना**

## शेतकरी महिला आघाडी

आणि

**पाणी, औषध, शिक्षण, जळण व रोजगारासाठी महिलाप्रधान विकासकार्यक्रम**

यांसाठी

# शेतकरी महिला आघाडीला विजयी करा

***शेतकरी महिला आघाडीचे हात बळकट करणाऱ्या अपक्ष शेतकरी संघटना उमेदवार कार्यकर्त्यांना विजयी करा***

## शेतकरी महिला आघाडीचा विजय असो

## शेतकरी संघटनेचा विजय असो

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.